सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १८८ | मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. सचिन पाटील**
नगरसेवक, अमळनेर



**श्री. मनीष सजनानी**
अमळनेर



**श्री. शिवाजी पाटील**
माजी जि. प. सदस्य



**श्री. राजेंद्र वर्मा**
संचालक :आशिष अलंकार, अमळनेर



**सौ. नेहा मोरे (पानसे)**
अमळनेर

# राज्यावर पुन्हा अवकाळी संकट!

## ४ एप्रिलपर्यंत वादळी पावसासह गारपिटीचा इशारा; शेतकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाची नोंद झाली असतानाच आज सोमवार, दि. ३० मार्चपासून राज्यात आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. आज प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भातदेखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो, असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार 'राज्यात ३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर १ ते ४ एप्रिलदरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

**जनावरांचीही काळजी घ्यावी**

मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, पत्र्याच्या निवाऱ्याखाली तसेच विद्युत ट्रान्स्फॉर्मर, विजेचे खांब आणि वीजवाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असे आवाहनही कृषी विभागाने केले आहे.

### अमळनेरसह परिसरात तुरळक पाऊस

अमळनेरसह परिसरात दिवसभर तापमानात वाढ झालेली होती. मात्र दुपारनंतर चारच्या सुमारास जोरदार वाऱ्यासह तुरळक पावसाला सुरूवात झाली. काही भागांत विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटाने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अवघ्या काही मिनिटांत पावसाला सुरूवात होऊन सर्वत्र काही काळ काळोख पाहावयास मिळाला. तसेच वीजपुरवठाही खंडित झाला.

# पालिकेने सर्वसाधारण सभा न घेतल्याने नागरिकांच्या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष

## शहर विकास आघाडीचा आरोप : कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेने विविध विषयांवर चर्चा करून त्यावर निर्णय घेण्यासंदर्भात मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्वसाधारण सभा घेतली होती. मात्र, मार्च महिना आता संपत आला, तरी पालिकेने या महिन्यातील सर्वसाधारण सभा घेतलेली नाही. वास्तविक पाहता गेल्या सभेच्या तारखेनंतर ही सभा २४ मार्च २०२६ रोजी अथवा याच तारखेच्या एक-दोन दिवस मागे-पुढे घेणे आवश्यक होते. यासंदर्भात येथील अमळनेर तालुका शहर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे आज सोमवार, ३० मार्च रोजी निवेदन देऊन पालिकेवर कारवाईची मागणी केली आहे.

आगामी एप्रिल महिन्यातील महात्मा फुले जन्मोत्सव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली येथील संतश्री सखाराम महाराज यात्रा उत्सव नियोजन व शहरातील विविध समस्या, तक्रारी व विकासकामांची मागणी यासाठी पालिकेने सर्वसाधारण सभा घेणे आवश्यक होते. मात्र, मार्च संपल्यानंतरही अद्याप पालिकेकडून सर्वसाधारण सभा घेण्याबाबत कोणतीही हालचाल नाही. हा प्रकार म्हणजे जणू पालिका नागरी हिताचे प्रश्न सोडविण्यापासून पळ काढत आहे, असा आरोप अमळनेर तालुका शहर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.



*अमळनेर : येथील पालिकेने सर्वसाधारण सभा न घेतल्याने नागरिकांच्या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत पालिकेवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना निवेदन देताना अमळनेर तालुका शहर विकास आघाडीचे नगरसेवक विजय कहारू पाटील, सचिन बळवंत पाटील व पदाधिकारी मुक्तार खाटीक, विक्रांत पाटील.*

निवेदनावर सौ. जयश्रीताई अनिलदादा पाटील, सौ. स्वप्नाताई विक्रांत पाटील, सौ. कविताताई विजयसिंग राजपूत, सौ. शोभाबाई भिवसन गढरे, सचिन विभाकर कासार, सचिन बळवंत पाटील, विजय कहारू पाटील, भरतकुमार सुरेश ललवाणी, देवेंद्र भानुदास कांबळे, अफसाना मुक्तार खाटीक, प्रवीण गंगाराम पाटील यांच्या सह्या आहेत.

# अमळनेर पालिका प्रशिक्षित फायरमनविनाच!

## नागरिकांच्या जीवाशी खेळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नागरिकांच्या सुरक्षेबाबत अत्यंत गंभीर आणि धक्कादायक बाब समोर आली आहे. येथील पालिकेच्या अग्निशमन विभागात एकही प्रशिक्षित फायरमन कार्यरत नसल्याचा अधिकृत खुलासा समोर आला आहे. यासंदर्भात अनेक लेखी तक्रारींनंतर पालिका प्रशासनाने दिलेल्या उत्तरातून ही धक्कादायक माहिती उघड झाली आहे. त्यामुळे लाखो नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शासनाच्या आदेशानुसार पालिकेत अग्निशमन विभागासाठी प्रशिक्षित फायरमन असणे बंधनकारक असताना ही पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याचे समोर आले आहे. इतकेच नव्हे तर अग्निशमन सेवेसाठी आवश्यक प्रशिक्षण घेतलेला एकही कर्मचारी सध्या कार्यरत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आग लागल्यास तत्काळ प्रतिसाद देणारी यंत्रणाच नसल्याचे चित्र असून, हा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात आहे. पालिका प्रशासनाच्या या भोंगळ कारभारामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे. शहराच्या विकास प्रक्रियेत दिवसागणिक इमारतींसह लोकसंख्या वाढत असताना अग्निशमनसारखी अत्यावश्यक सेवा सक्षम नसणे ही प्रशासनाच्या निष्क्रियतेची परिसीमा असल्याची चर्चा शहरात सुरू झाली आहे. या प्रकारामुळे मुख्याधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांसमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, हा प्रकार समोर आल्यानंतर अमळनेरकर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून 'आग लागल्यावर काय करायचे?' असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत. रिक्त फायरमनची पदे तत्काळ भरणे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आणि अग्निशमन विभाग सक्षम करणे या मागण्या आता जोर धरू लागल्या आहेत. यावर तत्काळ उपाययोजना न केल्या गेल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांकडून देण्यात आला आहे.





# प्लॅटफॉर्म क्र. २ वरील शेड अपूर्णच!

## अमळनेर रेल्वेस्थानकावरील स्थिती; प्रवाशांची गैरसोय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रेल्वेस्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर शेडची सुविधा अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे जळगावकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वाढत्या तापमानामुळे ही समस्या अधिक तीव्र झाली आहे.

गुजरातकडून येणाऱ्या रेल्वेगाड्या अमळनेर येथे प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर थांबा घेऊन जळगाव व भुसावळकडे प्रस्थान करतात. मात्र, या प्लॅटफॉर्मवरील शेड अपूर्णावस्थेत असल्याने अनेकदा गाड्या शेडच्या पुढे जाऊन थांबतात. परिणामी प्रवाशांना कडक उन्हात उभे राहावे लागते. याचा सर्वाधिक त्रास लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे.

उन्हात प्रतीक्षा, शेडचा अभाव आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने असलेल्या अडचणींमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, स्थानिक प्रवाशांनी या समस्येकडे भारतीय रेल्वे प्रशासनाने तत्काळ लक्ष देण्याची मागणी केली आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर अखंडपणे संपूर्ण शेड उभारणे, प्रवाशांसाठी बसण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.



*अमळनेर : रेल्वेस्थानकातील प्लॅटफॉर्म क्र. २ वर अपूर्णावस्थेत असलेले शेडचे काम.*

### दिनविशेष
३१ मार्च

- डॉ.आत्माराम पांडुरंग यांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली.
- मुंबईतील विजेवर चालणाऱ्या ट्रॅम बंद झाल्या.
- सचिन तेंडुलकरने एकदिवसीय क्रिकेटमध्ये दहा हजार धावा पूर्ण केल्या.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# अमळनेरसह तालुक्यात अजूनही सिलिंडरची टंचाई

## व्यावसायिक हवालदिल; एकेरी जोडणी असलेल्यांची मोठी अडचण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून घरगुती वापराच्या तसेच व्यावसायिक गॅस सिलिंडरची तीव्र टंचाई आहे. त्याचा फटका थेट घरगुती वापर असलेल्या ग्राहकांसह हॉटेल व्यावसायिकांनाही बसत आहे. गॅस सिलिंडर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

एकेरी गॅस जोडणी असलेल्या ग्राहकांची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. त्यांना गॅस सिलिंडरचा काटकसरीने वापर करत तारेवरची कसरत करावी लागत आहे. सिलिंडर संपल्यानंतर पर्याय काय? असा प्रश्न अनेकांसमोर निर्माण झाला आहे. दुसरीकडे व्यावसायिक गॅस सिलिंडरचे वितरणही विस्कळीत झाल्याने हॉटेल व्यावसायिकांचे हाल सुरू आहेत. काहींना तर व्यवसाय तात्पुरता बंद ठेवावा लागला असून, काहींनी इंधनासाठी लाकडाचा आधार घेतला आहे.

शहरात व्यावसायिक सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने हॉटेल उद्योगावर मोठा परिणाम झाला आहे. अनेक व्यावसायिकांनी पर्यायी उपायांचा अवलंब करण्यास सरूवात केली आहे. काहींनी लाकडी भट्ट्या, पारंपरिक चुली, डिझेलवर चालणाऱ्या भट्ट्या, तसेच विजेवर चालणारे स्टोव्ह व इंडक्शन उपकरणांचा वापर सुरू केला आहे.

हॉटेल व्यावसायिकांच्या मते-नियमितपणे मिळणारे गॅस सिलिंडर वेळेवर न मिळाल्याने स्वयंपाक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. ग्राहकांची मागणी कायम असतानाही गॅस सिलिंडरअभावी सेवा पुरविणे कठीण बनले असून, याचा थेट आर्थिक फटका बसत आहे. पर्यायी इंधन वापरल्यामुळे खर्चात वाढ होत आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून गॅस सिलिंडरची टंचाई नसल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात पुरवठा अपुरा असल्याचा आरोप व्यावसायिकांनी केला आहे. या समस्येवर तातडीने तोडगा काढून गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सध्याची परिस्थिती कायम राहिल्यास आगामी काळात हॉटेल व्यवसायावर आणखी गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



*अमळनेर : शहरासह तालुक्यात अजूनही गॅस सिलिंडरची टंचाई जाणवत असल्याने वेगळा पर्याय म्हणून पत्र्याची चूल तयार करताना हॉटेल व्यावसायिक महिला.*

**अभीष्टचिंतन**



श्री. राजेंद्र श्रीरामजी वर्मा
माजी अध्यक्ष : सोनार ॲण्ड सराफ असोसिएशन
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

: शुभेच्छुक :
सर्व सदस्य
सराफ बाजार असोसिएशन मित्र मंडळी व नातेवाईक, अमळनेर

## संपादकीय

# 'नासा'पेक्षाही स्वस्त उपग्रह

भारतातील दोन विद्यार्थ्यांनी वसतिगृहाच्या खोलीत बसून एक स्वस्त सॅटेलाईट विकसित केला. जो अवकाशातील गॅमा रेचा शोध घेण्यास सक्षम आहे.ओडिशातील स्नेहदीप कुमार आणि मोहित कुमार नायक या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर अवकाश संशोधनात नवा इतिहास रचला आहे. 'नेब्युला स्पेस ऑर्गनायझेशन' या आपल्या स्टार्टअपच्या माध्यमातून त्यांनी भारताचा पहिला 'गॅमा रे डिटेक्टिंग क्युबसॅट' (गॅमा किरणांचा शोध घेणारा छोटा उपग्रह) तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. ज्या उपकरणांसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च येतो, ती उपकरणे या विद्यार्थ्यांनी स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या साहित्यातून अत्यंत कमी खर्चात तयार केली आहेत. स्नेहदीप याच्या मते, जे ॲल्युमिनियम ७०७५ अवकाश पुरवठादारांकडून लाखो डॉलरना मिळते, तेच त्यांनी भुवनेश्वरमधील स्थानिक धातूच्या दुकानातून अवघ्या ७०० रुपयांत मिळविले. त्यांनी संशोधनातून हे सिद्ध केले, की कल्पकता आणि सखोल अभ्यासाच्या जोरावर अव्वाच्या सव्वा खर्च टाळूनही दर्जेदार उपग्रह बनविणे शक्य आहे. या विद्यार्थ्यांनी प्रगत तंत्रज्ञानाचा आणि स्मार्टफोन-आधारित प्रणालींचा वापर करून जटिल वैज्ञानिक प्रक्रिया सुलभकेल्या आहेत. अवकाश संशोधन केवळ श्रीमंत संस्थांपुरते मर्यादित राहू नये, तर ते सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध व्हावे, हेच या तरुणांचे उद्दिष्ट आहे.

स्नेहदीप यांना लहानपणापासूनच विज्ञानाची आणि अवकाशाची ओढ होती. त्यांनी सुरूवातीला 'अरोरा ॲकॅडमी जर्नल'च्या माध्यमातून तरुण संशोधकांना व्यासपीठ मिळवून दिले. पुढे भुवनेश्वरमधील वसतिगृहात त्यांची भेट मोहित यांच्याशी झाली आणि तिथूनच या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा प्रवास सुरू झाला. त्यांच्या या उपग्रहाचा मुख्य उद्देश कृष्णविवर (ब्लॅक होल) आणि वैश्विक स्फोटांमधून उत्सर्जित होणाऱ्या गॅमा किरणांचा अभ्यास करणे हा आहे. या दोन तरुणांची कामगिरी म्हणजे देशातील यवा शक्तीच्या सर्जनशीलतेचे आणि कर्तव्यभावनेचे प्रतीक ठरली आहे. संसाधनांची कमतरता असली तरीही मोठ्या वैज्ञानिक कल्पना प्रत्यक्षात उतरवता येतात हेच या 'नेब्युला स्पेस'च्या यशोगाथेने जगाला दाखवून दिले आहे. महागड्या उपकरणांवर अवलंबून न राहता त्यांनी सीएनसी मशिनच्या सहाय्याने स्थानिक पातळीवर उपग्रहांचे सुटे भाग तयार करून खर्च कमी केला आहे. हा क्युबसॅट आकारमानाने अत्यंत लहान आहे. साधारणपणे एका मोठ्या डब्याच्या आकाराचा असणारा हा उपग्रह अवघ्या १.३३ किलो वजनाचा आहे. पारंपरिक उपग्रहांच्या तुलनेत याचे वजन अत्यंत कमी असल्यामुळे तो अवकाशात प्रक्षेपित करण्यासाठी लागणारा खर्चही मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. या उपग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये गॅमा किरणांचा शोध घेण्यासाठी खास 'सिंटिलेटर' आधारित सेन्सर्स वापरण्यात आले आहेत.

सध्या या उपग्रहाच्या विविध तांत्रिक चाचण्यांवर काम करत आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार हा उपग्रह २०२६ च्या अखेरीस किंवा २०२७ च्या सुरूवातीला अवकाशात झेपावण्याची शक्यता आहे. यासाठी ते भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच 'इस्रो'सह खासगी प्रक्षेपण कंपन्यांच्या संपर्कात आहेत. या उपग्रहामुळे अवकाशातील रहस्यमय 'गॅमा रे बर्स्टर्स' आणि कृष्णविवरांच्या अभ्यासासाठी भारताला नवीन आणि स्वस्त माहिती स्रोत उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांनी सुरू केलेली ही जगातील पहिलीच अशा प्रकारची संस्था मानली जाते, जी नासा किंवा इस्रोसारख्या मोठ्या संस्थांप्रमाणेच प्रगत तंत्रज्ञानावर काम करत आहे. विशेषतः विकसनशील देशांना स्वस्त दरात अंतराळ डेटा उपलब्ध करून देणे, हे त्यांचे मोठे यश मानले जाते.

# परवानगीशिवाय बँक खात्यातून पैसे कापले जाऊ शकता का?

## काय आहेत नेमके नियम? समजावून घ्या




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बहुतेक लोकांना असे वाटते की बँक खात्यात जमा केलेले त्यांचे पैसे सुरक्षित आहेत आणि त्यांच्या परवानगीशिवाय कोणीही ते वापरू शकत नाही. पण हा विश्वास बरोबर आहे का? काही बाबतीत हे खरे आहे, तर काही बाबतीत ते चुकीचे असू शकते. कधीकधी, तुमच्या नकळत तुमच्या बँक खात्यातून पैसे कापले जातात आणि तुम्हाला त्याचे कारण समजत नाही.

बँक खात्यातून आपोआप पैसे केव्हा कापले जातात?

जेव्हा तुम्ही पूर्वी परवानगी दिलेली असते, म्हणजेच जेव्हा तुम्ही ऑटोपे सेट केलेले असते, तेव्हा अनेकदा बँक खात्यातून आपोआप पैसे कापले जातात. यामध्ये कर्जाचे ईएमआय, विम्याचे हप्ते किंवा एसआयपी यांचा समावेश होतो. जेव्हा तुम्ही ऑटो-डेबिट किंवा स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स सेट करता, तेव्हा बँक विशिष्ट वेळी पैसे कापण्यास अधिकृत करते. अशा परिस्थितीत, पैसे आपोआप कापले जातात.

**बँक शुल्क आणि सेवा शुल्क**

कधी-कधी, बँका ग्राहकाच्या बँक खात्यातून काही विशिष्ट शुल्क किंवा सेवा शुल्क आपोआप कापतात. यामध्ये खाते देखभाल शुल्क, एसएमएस शुल्क किंवा एटीएम शुल्क यांचा समावेश होतो. अशा परिस्थितीत, बँक तुमची संमती घेत नाही. हे सर्व शुल्क सहसा खाते उघडताना तुम्ही मान्य केलेल्या अटींचा भाग असतात.

बँक ग्राहकाच्या संमतीशिवाय बँक खात्यातून पैसे काढू शकत नाही. केवळ विशिष्ट परिस्थितीतच बँक खात्यातून पैसे वजा करू शकते, आणि तेही तेव्हाच जेव्हा तुम्ही आधीच तुमची संमती दिलेली असते. तुम्ही मंजूर न केलेला एखादा व्यवहार दिसल्यास, त्याकडे दुर्लक्ष करू नका. हे कधीकधी बँकेच्या चुकीमुळे किंवा तांत्रिक समस्येमुळे असू शकते. अशा परिस्थितीत, तात्काळ बँकेशी संपर्क साधा.

बँक तुमच्या परवानगीशिवाय तुमच्या खात्यातील शिल्लकमधून सेवा शुल्क किंवा फी देखील वजा करू शकते. खाते उघडतानाच बँक हे शुल्क वजा करण्यासाठी तुमची परवानगी घेते. जर तुम्ही किमान शिल्लक ठेवण्यात अयशस्वी झालात, तर बँक दंड आकारते.

याव्यतिरिक्त, एसएमएस अलर्ट शुल्क, वार्षिक डेबिट कार्ड फी आणि एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त एटीएम व्यवहारांसाठीचे शुल्क थेट तुमच्या खात्यातून वजा केले जातात. या छुपे शुल्कांबद्दल बँकेला चौकशी करण्याची आवश्यकता नसते.

# उत्तम आरोग्यासाठी पाणी कसे प्यावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निरोगी आरोग्यासाठी नियमित आणि पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. मात्र कितीही पाणी पिणे चांगले नाही. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाणी प्यायल्यावरच अनेक गंभीर आजारांपासून वाचता येते. म्हणून पाणी कसे प्यावे याबाबत माहिती जाणून घेऊया.



- जेवणाच्या अर्धा तास आधी एक ग्लास पाणी प्यावे. यामुळे अन्न चांगले पचते.
- काही जण जेवण झाल्यावर घटाघट पाणी पितात. हे चुकीचे आणि आरोग्यासाठीही धोकादायक आहे.
- अंघोळीला जाण्यापूर्वी एक ग्लास पाणी पिण्याची सवय ठेवा. त्यामुळे रक्तदाब कमी व्हायला मदत होते.
- रात्री झोपायला जाण्याआधी एक ग्लास पाणी पिण्याचीही सवय लावून घ्या.
- तोंडात जी लाळ तयार होते ती पोटातील अन्न पचविण्यासाठी, आम्ल तयार करण्यासाठी फायद्याची ठरते. त्यासाठी हळूवार पाणी प्यावे.
- दररोज सकाळी रिकाम्यापोटी १ ग्लास गरम पाण्यात २ चमचे मध आणि अर्धा चमचा लिंबाचा रस घालून प्यावे.
- पाणी कधीही बसूनच प्यावे. त्यामुळे निर्माण होणारे क्षार पोटात अन्नाचे चांगले पचन करतात.



**अमळनेर : आर. के. नगर भागातील खुल्या जागेत असलेल्या विहिरीत पडलेल्या गायीला बाहेर काढण्यावेळी एकत्रित आलेले पालिका अग्निशमन दलाचे कर्मचारी.**


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आर. के. नगरमधील विहिरीत गाय पडली होती. अग्निशमन दलाने तिला सुखरूप बाहेर काढून सुटका केली. यासंदर्भात ३० मार्च रोजी सकाळी ७ वाजता नगरसेवक महेश देशमुख यांना कळाले, की आर. के. नगर भागातील खुल्या जागेत असलेल्या विहिरीत गाय पडली आहे. त्यांनी तातडीने पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना कळविले.

त्यानंतर अग्निशमन दलाचे गणेश गोसावी, दिनेश बिऱ्हाडे, मच्छिंद्र चौधरी, भिका संदानशीव, समाधान केदार, आनंद बैसाणे, अक्षय अहिरे, राकेश शिरसाठ यांनी विहिरीत दोर टाकून गायीला बाहेर काढले.

## उन्हाळ्यात शरीर कसे थंड ठेवाल?

१) **सकाळी उठल्यावर पाणी पिणे :** सकाळी उठल्यानंतर लगेच १ ग्लास थंड (साधे माठातील) पाणी प्यावे.
२) **लिंबू-पाणी :** शक्य असल्यास दररोज सकाळी रिकाम्या पोटी लिंबू पाणी घ्यावे.
३) **ताकाचे सेवन :** शरीराला थंडावा मिळण्यासाठी रोज १ ते २ वेळा ताक नक्की प्यावे.
४) **नारळ पाणी :** नारळाचे पाणी हे नैसर्गिकरीत्या थंड असते. त्याचा समावेश तुमच्या दैनंदिन आहारात करा.
५) **पुरेसे पाणी पिणे :** घराबाहेर पडण्यापूर्वी नेहमी भरपूर पाणी पिऊन बाहेर पडावे.
६) **डोके झाकून ठेवा :** उन्हात बाहेर फिरताना डोक्याला रुमाल किंवा टोपी लावून डोके झाकून ठेवावे.
७) **सुती कपड्यांचा वापर :** उष्णतेपासून वाचण्यासाठी नेहमी सुती (कॉटनचे) आणि हलके कपडे घालावेत.
८) **तळलेले पदार्थ टाळा :** जास्त तेलकट, तळलेल्या किंवा भाजलेल्या पदार्थांचे सेवन करणे टाळावे.
९) **पुदिना पाणी :** पिण्याच्या पाण्यात पुदिना घालून ते पाणी प्यावे, यामुळे शरीराला ताजेतवाने वाटते.
१०) **बेलचे सरबत :** उन्हाळ्यात बेलचे सरबत पिणे आरोग्यासाठी आणि शरीर थंड ठेवण्यासाठी खूप फायदेशीर ठरते.



# पाणथळाच्या जागी आढळणारी 'पाणकोंबडी'

**पक्ष्यांची ओळख**

**नाव :** पाणकोंबडी (Moorhen)
रंग : काही गडद निळ्या रंगाच्या तर काही पांढऱ्या छातीच्या आढळतात.
**चोच :** लांब आणि पिवळ्या रंगाची असते.वरच्या भागात कपाळावर एक लाल ठिपका असतो.
**डोळे :** पाणकोंबडीचे डोळे लाल रंगाचे असतात
**घरटे :** पाणकोंबडी पाण्या जवळ, नाले,तलाव शेजारी काड्या व पाणवनस्पतीच्या मदतीने घरटे बांधते.लपण असावी म्हणून दाट गर्द तीन फुटी झुडपांमध्ये घरटे असते.
**अंडी :** मादी जून महिन्यात चार पाच अंडी घालते.अंड्यांचा रंग फिकट तपकिरी असून त्यावर लहान ठिपके असतात.नर अंड्यांचा सांभाळ करतो.
**भक्ष :** पाण्यातील वनस्पती,किटक, शेवाळे,बिया
आवाज : कर्कश्श, कूक कूक ओरडत फिरते.
**इतर वैशिष्ट्ये :** जलप्रदुषणामुळे पाणकोंबड्यांची संख्या घटते आहे.मानवी वस्ती, इमारतींचे वाढते बांधकाम यामुळे नाले,पाणथळ कमी होत आहे.मुंगूस,साप. कोल्हे व शिकारी हे पाणकोंबडीचे शत्रू होत.भारतभर आढळते. अमळनेरात डुबकी रस्त्यावरचा नाला, धार पाझर तलाव, रेल्वेपुलाखाली झुडपात पाणकोंबडीची वस्ती आहे.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.

# युद्धात बेसुमार खर्च झाल्याने रशियाने विकले १४ टन सोने

## परिस्थिती आवाक्यात न आल्यास अजून सोने विक्रीची ओढवेल नामुष्की...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

युद्धखर्च वाढत असताना आणि उत्पन्न घटत असताना रशियाला आर्थिक ताण जाणवू लागला आहे. परिस्थिती हाताळण्यासाठी तब्बल २५ वर्षांनंतर रशियाने मोठा निर्णय घेतला आहे. कल्पना करा, की एक अत्यंत श्रीमंत घर आहे. त्या घराच्या मालकाकडे रोख रक्कम आहे, जमीन आहे आणि सर्वात महत्त्वाचे सोन्याने भरलेली एक तिजोरी आहे. ते सोने केवळ दिखाव्यासाठी नाही, तर कठीण काळासाठी राखून ठेवलेले आहे. पण आता परिस्थिती अशी झाली आहे की ती तिजोरी उघडावीच लागत आहे. हे श्रीमंताचे घर म्हणजे अन्य कोणी नसून रशिया आहे.

तब्बल २५ वर्षांनंतर प्रथमच रशियाने आपल्या तिजोरीतील प्रत्यक्ष सोन्याच्या विटा बाजारात विकण्यास सुरूवात केली आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी २०२६ या केवळ दोन महिन्यांत रशियाने १४ टन सोने विकले आहे.


### खर्च वाढला, उत्पन्न घटले

रशिया गेल्या काही वर्षांपासून सातत्याने प्रचंड लष्करी खर्च करत आहे. युद्ध लांबत गेले तसा खर्चही वाढत गेला. दुसरीकडे तेलाच्या किमतींमध्ये घसरण आणि अमेरिकेच्या कडक निर्बंधांमुळे उत्पन्नावर मोठा आघात झाला. पूर्वी तेल आणि गॅसमधून सरकारची कमाई मजबूत राहत होती. आता ती केवळ सुमारे २० टक्क्यांवर आली आहे, म्हणजे निम्म्याहूनही कमी. खर्च वाढत गेला आणि उत्पन्न घटत गेले. त्यामुळे २०२५ मध्ये रशियाची बजेट तूट जीडीपीच्या २.६ टक्क्यांपर्यंत पोहोचली. सुरूवातीला केवळ ०.५ टक्के तुटीचा अंदाज होता. काही तज्ज्ञांच्या मते वास्तविक तूट ३.४ टक्क्यांच्या जवळ असू शकते.

### किती सोने विकले?

२०२६ च्या पहिल्या दोन महिन्यांतच रशियाने विक्रमी प्रमाणात सोने विकले. जानेवारी २०२६ : ३ लाख औंस सोने विकले फेब्रुवारी २०२६ : २ लाख औंस सोने विकले एकूण : केवळ दोन महिन्यांत १४ टन सोने बाजारात आले यापूर्वी फक्त कागदोपत्री सोन्याचे व्यवहार होत होते आणि सोने तिजोरीतच राहत होते. पण आता प्रत्यक्ष सोन्याच्या विटा विकल्या जात आहेत.

सोने विकण्याची वेळ का आली? याचे थेट उत्तर आहे रोख रकमेची गरज. वाढता खर्च आणि वाढती तूट भरून काढण्यासाठी रशियाला तातडीने पैसे हवे होते. रोख रक्कम कमी पडू लागली तेव्हा त्याने आपली सर्वात मजबूत संपत्ती सोने विकण्यास सुरुवात केली. रशिया सध्या पैसे उभारण्यासाठी अनेक मार्ग अवलंबत आहे. ज्यात नॅशनल वेल्फेअर फंडामधून पैसे काढणे, सरकारी बाँड अधिक प्रमाणात जारी करणे आणि कर वाढवणे याचा समावेश आहे. पण या सर्व उपायांनंतरही दबाव कायम असल्याने आता सोनेही विकावे लागत आहे.




### महागडे सोने, संकटातही संधी

एक मनोरंजक बाब म्हणजे सध्या सोन्याची किंमत ५,००० डॉलर प्रति औंसच्या वर पोहोचली आहे. त्यामुळे रशियाला त्याच्या सोन्याची चांगली किंमत मिळत आहे. याचा परिणाम म्हणजे रशियाच्या एकूण साठ्याचे मूल्य ८०० डॉलर अब्जांहून अधिक झाले आहे. एकीकडे मजबुरी आहे, तर दुसरीकडे चांगली किंमतही मिळत आहे.

### रशियाकडे आणखी किती सोने शिल्लक?

सोने विकूनही रशियाकडे अजून ७४.३ दशलक्ष औंस म्हणजेच २,००० टनांहून अधिक सोने शिल्लक आहे. मात्र हे चार वर्षांतील सर्वांत कमी पातळी आहे. तरीही रशिया अजून जगातील पाचव्या क्रमांकाचा सोनेधारक देश आहे.

### चिंता का वाढत आहे?

रशियाकडे अजूनही मोठा साठा असला तरी चिंतेची कारणे आहेत.
- साठ्याचा वापर आता थेट होत आहे.
- सोने विकून रोख रक्कम उभारावी लागत आहे.
- युद्ध चौथ्या वर्षात पोहोचले आहे.
- 'सुरक्षिततेचे कुशन' हळूहळू कमी होत आहे.

सोप्या भाषेत सांगायचे तर समजा तुमच्या घरात सोने किंवा एफडी आहे. जी तुम्ही फक्त कठीण काळासाठी राखून ठेवली आहे. जर तुम्ही ती विकू किंवा मोडू लागलात, तर याचा अर्थ खर्च आणि उत्पन्नाचा समतोल बिघडला आहे. रशिया सध्या त्याच परिस्थितीतून जात आहे.

### पुढे काय होणार?

जगाचे लक्ष आता तीन प्रश्नांवर आहे.
- युद्ध लवकर संपेल का?
- तेलाच्या किमती सुधारतील का?
- रशियाला आणखी सोने विकावे लागेल का?

जर परिस्थिती सुधारली नाही तर रशियाला पुढेही सोने विकत राहावे लागेल. आणि हे केवळ रशियाबाबत मर्यादी राहणार नाही संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर याचे परिणाम होऊ शकतात.

### प्रश्न : रशियाने नक्की काय केले?

- रशियाने सुमारे २५ वर्षांनंतर प्रथमच आपल्या तिजोरीतील प्रत्यक्ष सोन्याच्या विटा बाजारात विकण्यास सुरूवात केली. यापूर्वी फक्त कागदोपत्री व्यवहार होत होते.

प्रश्न : सोने विकण्याची गरज का पडली?
- वाढता लष्करी खर्च आणि घटते उत्पन्न हे थेट कारण आहे. तेल-गॅसची कमाई निम्म्याहून कमी झाली आणि निर्बंधांचा दबाव वाढला. त्यामुळे बजेट तूट भरून काढण्यासाठी सोने विकावे लागले.

### प्रश्न : हे केवळ मजबूरी आहे की रणनीतीही?

- दोन्ही. मजबुरी आहे. कारण तूट वाढत आहे. रणनीती आहे. कारण सध्या सोन्याची किंमत ५,००० डॉलर प्रति औंसहून अधिक आहे. त्यामुळे चांगली किंमत मिळत आहे.

प्रश्न:रशियाकडेआताकितीसोनेशिल्लकआहे?
- अजूनही २,००० टनांहून अधिक सोने शिल्लक आहे. रशिया जगातील पाचव्या क्रमांकाचा सोन्याचा साठा असलेला देश आहे. मात्र हे चार वर्षांतील सर्वात कमी पातळी आहे.

प्रश्न : पुढे काय होणार?
- सर्व काही युद्ध कधी संपते, तेलाच्या किमती काय होतात आणि रशियाचे उत्पन्न कधी सुधारते यावर अवलंबून आहे. परिस्थिती न सुधारल्यास आणखी सोने विकावे लागू शकते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# नवरा-बायकोने सोडली आयटी कंपनीतील नोकरी!

## एका निर्णयाने बदलले आयुष्य; 'या' व्यवसायातून वर्षाला होतो लाखोंचा लाभ



सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बहुतांश लोकांसाठी स्थिर आणि चांगली नोकरी म्हणजेच यश मानले जाते. मात्र के. मणिकंता आणि नागा वेंकट दुर्गा पावनी या आंध्र प्रदेशातील दाम्पत्याने हा समज मोडीत काढत वेगळी वाट निवडली. त्यांनी उच्च पगाराच्या आयटी नोकऱ्या सोडून जैविक शेती आणि ऑरगॅनिक व्यवसाय सुरू केला. लोकांना निरोगी, शुद्ध अन्न मिळावे आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता.

### आयटी करिअर सोडून घेतला मोठा निर्णय

दोघेही बी.टेक पदवीधर असून त्यांनी सुरुवातीला आयटी क्षेत्रात करिअर केले. मणिकंता इन्फोसिसमध्ये, तर पावनी ॲक्सेंचरमध्ये कार्यरत होत्या. चांगला पगार आणि स्थिर जीवन असूनही त्यांना समाधान मिळत नव्हते. मणिकंता यांच्या मते, आयटी क्षेत्रात अनेकजण चांगली कमाई करत असले तरी त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. पावनी यांनाही लोकांच्या बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या आजारांची चिंता वाटू लागली. याच विचारातून त्यांनी काहीतरी वेगळे करण्याचा निर्णय घेतला.

### 'श्रेष्ठ'ची संकल्पना

लोकांच्या आरोग्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी 'श्रेष्ठ' नावाचे ऑरगॅनिक स्टोअर सुरू करण्याचा विचार केला. चुकीच्या आहारपद्धतीमुळे वाढणारे आजार आणि ऑरगॅनिक शेतकऱ्यांना बाजारपेठेतील अडचणी या दोन्ही समस्या त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. त्यामुळे हा व्यवसाय केवळ नफा कमावण्यासाठी नसून समाजोपयोगी असावा, अशी त्यांची भूमिका होती.

### शून्यातून शिकले शेतीचे धडे

शेतीचा कोणताही अनुभव नसताना त्यांनी नव्याने सुरूवात केली. त्यांनी सुभाष पालेकर नॅचरल फार्मिंग पद्धतीचे प्रशिक्षण घेतले. या पद्धतीत रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर टाळून नैसर्गिक शेती केली जाते. मणिकंता चेन्नईमध्ये नोकरी करत असताना आठवड्याच्या शेवटी आंध्र प्रदेशातील आपल्या गावी जाऊन प्रशिक्षण घेत असत. नोकरी आणि प्रशिक्षण यांचा समतोल राखणे कठीण होते, पण बदल घडवण्याच्या ध्येयाने त्यांना प्रेरित केले.

### गुंतवणूक आणि सुरूवात

२०१७ मध्ये त्यांनी नोकरीचा राजीनामा देत आपल्या बचतीतील सुमारे १७ लाख रुपये 'श्रेष्ठ'मध्ये गुंतवले. सुरूवातीला त्यांच्याकडे दुकानही नव्हते. मणिकंता स्वतः शेतकऱ्यांकडून उत्पादने घेऊन ग्राहकांपर्यंत पोहोचवत होते. आंबा, बाजरी पीठ, तूर डाळ आणि हेल्थ मिक्स पावडर यांसारख्या ऑरगॅनिक उत्पादनांपासून त्यांनी व्यवसायाची सुरूवात केली.

### शेतकऱ्यांसाठी ठरला आधार

'श्रेष्ठ'चा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना सक्षम करणे हा होता. त्यांनी ऑरगॅनिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून थेट माल खरेदी करून त्यांना योग्य दर दिला. कृष्णा जिल्ह्यातील शेतकरी महा लक्ष्मन यांनी सांगितले, की पूर्वी ऑरगॅनिक आंब्याला योग्य किंमत मिळत नव्हती. पारंपरिक बाजारात त्यांना सुमारे दोन लाख रुपये मिळत होते. मात्र, 'श्रेष्ठ'सोबत काम केल्यानंतर त्यांची कमाई दुप्पट होऊन चार लाखांपर्यंत पोहोचली.

# 'वाजले की बारा'साठी अमृता खानविलकरला नेमकी किती फी मिळाली?

## १६ वर्षांनंतर तिनेच केला सविस्तरपणे दिलखुलास खुलासा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभिनेत्री अमृता खानविलकरने एका मुलाखतीत तिच्या गाजलेल्या गाण्याबद्दल खुलासा केला. 'वाजले की बारा' या लावणी गीतासाठी तिला किती फी मिळालेली आहे, हे सुद्धा तिने सांगितले.

मराठी सिनेसृष्टीला लावणीची मोठी परंपरा आहे. बऱ्याच जुन्या सिनेमांमध्ये लावणी दाखवल्या गेल्या आहेत ज्यांची गाणी आजही प्रेक्षकांना ठेका धरायला भाग पडतात. आताच्या काळात सुद्धा बऱ्याच ठिकाणी लावण्या सादर होतात. मध्यंतरी लावणी वर आधारित 'नटरंग' हा सिनेमा प्रचंड गाजला होता. या सिनेमातील प्रत्येक गाणी सुपरहिट झालेली.

अतुल कुलकर्णी यांची मुख्य भूमिका असलेल्या 'नटरंग'मध्ये 'वाजले की बारा' हे लावणी गीत पाहायला मिळालेले. नटरंग सिनेमाला रिलीज होऊन आता जवळपास १६ वर्षे उलटली तरीही या सिनेमातील गाण्यांची लोकप्रियता कमी झालेली नाही. 'वाजले की बारा' हे गाणे आताही कुठेही वाजले तरी त्यावर लोक बेधुंद होऊन नाचतात. सिनेमात या गाण्यावर अभिनेत्री अमृता खानविलकर हिचा नृत्याविष्कार पाहायला मिळाला होता.

या सिनेमात अमृताने 'वाजले की बारा' या गाण्यावर जे नृत्य सादर केलेले त्याची जादू प्रेक्षकांच्या मनातून अजूनही उतरलेली नाही. तिने नुकतेच एका मुलाखतीत या गाण्यासाठी मिळालेल्या मानधनाबद्दल खुलासा केला. अमृता म्हणाली, की आम्ही हे गाणे दोन रात्रींमध्ये शूट केले होते. त्यावेळी मला रात्री दहा वाजता या गाण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. म्हणजेच रात्री दहा वाजता तू हे गाणे करशील का? असे विचारले आणि मी सुद्धा त्यांना लगेच हो म्हटले. त्यावेळी मला या गाण्यासाठी तीस हजार रुपये मानधन मिळाले होते. अमृता खानविलकर पुढे मिळाली, की मी एक गोष्ट आवर्जून सांगेन, या गाण्यामुळेच माझे आयुष्य पूर्णपणे बदलले. या गाण्याची क्रेझ इतकी आहे, की आयुष्यात पहिल्यांदा मी अशा ठिकाणी परफॉर्म केले होते तेथे इलेक्ट्रिसिटी सुद्धा नव्हती. बऱ्याच ठिकाणी मी ही लावणी सादर केली. बऱ्याचदा असे व्हायचे, की अनेक भागात लाईट वगैरे नसायच्या तरीही लोक माझा 'वाजले की बारा' या गाण्यावरचा डान्स पाहायला यायचे. संपूर्ण जगभरात हे गाणे गाजले. या गाण्यामुळे मला प्रचंड लोकप्रियता मिळाली. तब्बल दहा हजार लोकांसमोर परफॉर्म करण्याचे संधी मिळाली एकंदर माझा संपूर्ण आयुष्य या गाण्यामुळे बदलले.

# माठ घेताना 'ही' गोष्ट तपासता का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उन्हाळ्यात प्यायला थंड पाणी सर्वांनाच हवे असते. पण बरेच लोक उन्हाळा असला तरीही फ्रीजमधील पाणी पीत नाही. कारण त्यामुळे त्यांना त्रास होतो. अशावेळी माठातील पाणी जास्त सोयीचे आणि फायदेशीर ठरते. माठातील पाणी चांगले असले तरी ते जर थंडच झाले नाही तर ते प्यावेसेही वाटत नाही. म्हणूनच माठ घेताना काही महत्त्वाच्या गोष्टी तपासणे गरजेचे आहे. नाहीतर माठातील पाणी थंड होत नाही, आपल्याला ते प्यावेसे वाटत नाही.



### या पद्धतीने निवडा चांगला माठ

सगळ्यात आधी तर माठाला खूप जास्त गळती होते का? त्याला खूप बारीक-बारीक छिद्र आहेत का ते तपासा. माठातून थोड्या प्रमाणात पाणी झिरपणे योग्य असते. कारण त्यामुळे माठ थंड व्हायला मदत होते. पण माठ खूप जास्त गालात नाही ना हे तपासा. त्यासाठी माठ बोटाने थोडा वाजवून पाहा. वाजवल्यानंतर कंपनाचा आवाज स्पष्ट येत असेल तर माठ भरीव आहे. पण जर आवाज दबका असेल आणि कंपन होत नसेल, तर त्याला गळती असू शकते.

खूप शंका वाटल्यास मठामध्ये थोडे पाणी टाकून तुम्ही तपासू शकता. माठात पाणी भरा एखाद्या कोरड्या जागी ठेवा. यानंतर पाणी गाळते की नाही हे तपासा. कमी वेळेत जास्त पाणी गळत असेल तर तो माठ योग्य नाही. खूप किंचित पाणी गळत असेल तर तो माठ घेऊ शकता. हल्ली बाजारात विविध प्रकारचे आणि रंगांचे माठ विक्रीसाठी येतात. पण जास्त रंग किंवा डिझाईन असलेला माठ शक्यतो घेऊ नका. कारण यात बऱ्याचदा रासायनिक रंग वापले जातात. ज्यामुळे माठ तर सुंदर दिसतो. पण माठामध्ये पाणी झिरपण्यासाठी जे अगदी बारीक-बारीक छिद्र असतात ते हा रंग बंद करतात. यामुळे माठामध्ये थंड हवा जात नाही आणि माठ जास्त प्रमाणात पाणी थंड करत नाही.

### पाणी थंड होण्यासाठी हेच असते महत्त्वाचे

माठ खरेदी करताना त्याचे तोंड मोठे म्हणजेच रुंद असावे. कारण यामुळे माठातील पाणी काढायलाही सोपे जाते आणि माठ स्वच्छ करणेही अवघड जात नाही. शिवाय माठामध्ये हवा खेळती राहते. ज्यामुळे माठातील पाणी व्यवस्थित थंड होते. माठाला कोणत्या प्रकारचा रंग दिलेला आहे तेदेखील तपासा. म्हणजे फिकट लाल, तपकिरी किंवा बेज रंगाचे माठ शक्यतो नैसर्गिक मातीपासून बनवलेले असतात. पण खूप गडद लाल किंवा चमकदार रंगाचे माठ रासायनिक रंग किंवा पॉलिश वापरून बनवले जातात. अशा माठात पाणी थंड होत नाही.

# ऑस्ट्रेलियाचा शेन वॉर्न निघाला खरा 'धुरंधर'

## १८ वर्षांपूर्वीच्या एका अटीमुळे कुटुंबावर ४६० कोटींचा पडणार पाऊस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मैदानावर फिरकीच्या जादूने बॅट्समनला नाचवणारा ऑस्ट्रेलियाचा महान स्पिनर शेन वॉर्न हा केवळ क्रिकेटचाच नाही, तर गणिताचाही पक्का खिलाडी होता, हे आता सिद्ध झाले आहे. शेन वॉर्न आज आपल्यात नसला, तरी त्याने सुमारे १८ वर्षांपूर्वी लावलेल्या एका दूरदृष्टीच्या 'डावा'मुळे आता त्याच्या कुटुंबावर पैशांचा पाऊस पडणार आहे.

'आयपीएल'मधील राजस्थान रॉयल्स ही टीम विकली गेल्याने वॉर्नच्या वारसांना तब्बल ४५० कोटी रुपयांहून अधिक रक्कम मिळणार आहे. एका खेळाडूने खेळता-खेळता आपल्या कुटुंबाचे भविष्य कसे सुरक्षित केले. हे नेमके कसे झाले? शेन वॉर्नने कसे डोके चालवले होते?

राजस्थान रॉयल्स या टीमची मालकी आता बदलली असून, अमेरिकेतील एका समूहाने ही टीम तब्बल १५ हजार २९० कोटी रुपयांना (१.६३ अब्ज डॉलर) खरेदी केली आहे. या अवाढव्य व्यवहारामुळे शेन वॉर्नच्या करारातील एक गुप्त अट आता चर्चेत आली आहे. २००८ मध्ये जेव्हा 'आयपीएल'चे पहिले सीजन सुरू झाले तेव्हा वॉर्नने राजस्थान रॉयल्सचा कॅप्टन बनण्यासाठी एक विशेष अट घातली होती. जिचा फायदा आता दोन दशकांनंतर त्याच्या मुलांना मिळणार आहे.

### काय होती शेन वॉर्नची अट?

शेन वॉर्नने राजस्थान रॉयल्ससाठी ४ सीजन खेळले आणि त्यासाठी त्याने सुमारे ९.३५ कोटी रुपयांचे मानधन घेतले होते. मात्र, खरा ट्विस्ट त्याच्या पगारात नव्हता, तर त्याने घेतलेल्या 'इक्विटी'मध्ये होता. निवृत्तीनंतर पुन्हा मैदानात परतण्यासाठी वॉर्नने अट ठेवली होती, की तो जोपर्यंत या टीमसाठी खेळेल तोपर्यंत दरवर्षी त्याला टीममधील ०.७५ टक्के मालकी हक्क (इक्विटी) दिले जातील. वॉर्नने सलग ४ सीजन खेळल्यामुळे राजस्थान रॉयल्समध्ये त्याचा एकूण हिस्सा ३ टक्के झाला होता.

### आता ४६० कोटी रुपये

आज जेव्हा राजस्थान रॉयल्सची १५ हजार ३०१ कोटी रुपयांना विक्री झाली आहे, तेव्हा वॉर्नचा तो ३ टक्के हिस्सा तब्बल ४६० कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे. ज्यावेळी २००८ मध्ये मनोज बदाले यांच्या 'इमर्जिंग मीडिया'ने ही टीम अवघ्या ६.७ कोटी डॉलरमध्ये खरेदी केली होती, तेव्हा कोणालाही वाटले नव्हते की भविष्यात तिची किंमत एवढी वाढेल. मात्र, वॉर्नने तेव्हाच या टीमच्या भविष्यातील मूल्याचा अंदाज बांधला होता.

### कुटुंबाला कधी मिळणार हे पैसे?

शेन वॉर्नचे २०२२ मध्ये निधन झाले. मात्र त्याने पेरलेल्या या गुंतवणुकीचे फळ आता त्याच्या मुलांना मिळणार आहे. 'आयपीएल'चे २०२६ चे सीजन संपल्यानंतर वॉर्नचे कुटुंब आपला हा हिस्सा विकून ही मोठी रक्कम मिळवू शकणार आहे. अर्थात, या संपूर्ण व्यवहाराला बीसीसीआयची मंजुरी मिळणे आवश्यक आहे. शेन वॉर्नने केवळ २००८ मध्ये त्याच्या कॅप्टनसीमध्ये राजस्थानला चॅम्पियन बनवले नव्हते, तर आर्थिक गणितातही त्याने कुटुंबाला 'विजेते' बनवले आहे.




# 'तुम्हीही घरी देवाभाऊ म्हणता का?'

## अमृताताई फडणवीस यांनी दिले भन्नाट उत्तर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'आपण जसे आहोत तसेच राहावे. आपले विचार तसेच मांडावेत.', असे मुंबईत एका टीव्ही चॅनलच्या महिला सन्मान सोहळ्यात सौ. अमृताताई फडणवीस म्हणाल्या. यावेळी त्यांनी विविध प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे दिली. एमबीए केल्यानंतर बँकेत नोकरी केली. तेथे खूप शिकल्या. पंतप्रधानांच्या 'बेटी बचाओ' नाऱ्याप्रमाणे मुलींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी गरीब-श्रीमंत सर्व मुलींशी संवाद साधला. आता मुलींना स्वतः कमावलेला पैसा हाच सशक्तीकरणाचा खरा अर्थ समजू लागला आहे, असे त्या म्हणाल्या. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीसांना देवाभाऊ म्हणतात. तुम्ही घरीदेखील कधी देवाभाऊ म्हणता का?, असा मिश्कील प्रश्न त्यांना विचारण्यात आला. या प्रश्नाचे त्यांनी हजारजबाबीपणे आपल्या खास स्टाइलने उत्तर दिले.

### नोकरी सोडून नवीन वाट

बँकेची नोकरी सोडून अमृता आता स्वतःची कन्सल्टन्सी सुरू करत आहेत. पाच सहकाऱ्यांसोबत काम करणार असून यातून लोकसेवा आणि सामाजिक कामे कायमस्वरूपी सुरू ठेवणार असल्याचे त्या म्हणाल्या. 'लोकांसाठी काही करणे हेच खरे जीवन आहे. देवाने ही संधी दिली आहे,' असे त्यांनी सांगितले. आजूबाजूच्या बदलांबाबत अपडेट राहणे आणि आवाज उठवणे गरजेचे असल्याचेही त्या म्हणाल्या. 'रश्मी वहिनींच्या हातचे साबूदाणे वडे अन् देवेंद्रजींची आवड', मातोश्रीवर जाणार? सौ. अमृताताई फडणवीसांनी स्पष्टच सांगितले.

### भोंदू बाबांवर कडक टीका

अशोक खरात प्रकरणावर बोलताना अमृता म्हणाल्या, की 'डोळे बंद करून भोंदू बाबांवर विश्वास ठेवू नका. अंधश्रद्धा घातक आहे.' पोलीस व कायद्यावर विश्वास ठेवा. सर्व बाबा वाईट नाहीत, पण मेहनत, नीतिमत्ता आणि रामायण-महाभारतातील शिकवणुकींवर श्रद्धा ठेवा. मुख्यमंत्र्यांनीही अशा प्रकरणात लवकर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### राजकारणात येणार नाही

'खरी बातमी, खोटी बातमी'मध्ये सौ. अमृताताई म्हणाल्या, की 'देवेंद्र फडणवीसांनी सांगितले, की एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत. मीही एक तलवार आहे. म्हणून राजकारणात येणार नाही.' ट्रोलिंगला 'लॅडर' समजून पार करा. आपले विचार पूर्ण करा, लोक कधी चांगले तर कधी वाईट बोलतील, पण आपले काम चालू ठेवा. 'आता हुडी घालून लोक वर्षा बंगल्यावर येतात', एका कार्यक्रमात अमृता फडणवीसांनी स्पष्टच सांगितले. 'तुम्हीपण देवाभाऊ म्हणता का?' देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्रात देवाभाऊ म्हणतात. तुम्हीपण त्यांना देवाभाऊ म्हणता का? असा मिश्कील प्रश्न संबंधित टीव्ही चॅनलचे मुख्य संपादक सुतार यांनी विचारला. यावर सौ. अमृताताई फडणवीस यांनी हसत उत्तर दिले. आता देवाभाऊ म्हणण्याची वेळ आली आहे. आतापर्यंत नाही म्हटले. पण विचार चांगला आहे, असे त्या म्हणाल्या.



शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे






भगवान महावीर जयंती विशेष

# अहिंसा, सत्य आणि आत्मशुद्धीचा संदेश देणारा पावन उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृतीत अनेक धार्मिक व आध्यात्मिक परंपरांनी मानवजातीला योग्य जीवनमूल्ये दिली आहेत. त्या परंपरांमध्ये जैन धर्माला विशेष स्थान आहे. जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची ३१ मार्च रोजी जयंती. यानिमित्त जयंती ही जैन समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी उत्सव आहे. हा दिवस आपल्याला अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि संयम यांसारख्या मूल्यांची जाणीव करून देतो.

### भगवान महावीरांचे जीवनचरित्र

भगवान महावीर यांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये वैशालीजवळील कुंडग्राम येथे झाला. त्यांचे बालनाव वर्धमान असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यात धैर्य, करुणा आणि विवेकशीलता दिसून येत होती. त्यांनी वैभवशाली जीवनाचा त्याग करून ३० व्या वर्षी संन्यास स्वीकारला आणि कठोर तपश्चर्या सुरू केली. सुमारे १२ वर्षांच्या साधनेनंतर त्यांना केवलज्ञान (पूर्ण ज्ञान) प्राप्त झाले. महावीरांनी आपल्या उपदेशातून लोकांना जीवनाचे खरे तत्त्वज्ञान सांगितले. त्यांनी सांगितले, की प्रत्येक जीवाला जगण्याचा समान अधिकार आहे. त्यामुळे कोणत्याही सजीवाला इजा करणे हे पाप आहे.

### महावीरांचे तत्त्वज्ञान

महावीरांनी दिलेली शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांच्या प्रमुख शिकवणी पुढीलप्रमाणे आहेत.

**अहिंसा (अहिंसात्मक जीवन) :** कोणत्याही जीवाला मन, वचन किंवा कर्माने इजा करू नये.

**सत्य :** नेहमी सत्य बोलावे आणि सत्याचा स्वीकार करावा.

**अस्तेय :** चोरी करू नये किंवा इतरांच्या वस्तूंवर अन्यायाने अधिकार गाजवू नये.

**ब्रह्मचर्य :** इंद्रियसंयम राखणे.

**अपरिग्रह :** अनावश्यक वस्तूंचा संग्रह टाळणे.

आजच्या भौतिकतावादी जगात ही तत्त्वे अत्यंत उपयुक्त ठरतात. वाढती हिंसा, लोभ आणि स्पर्धा यामुळे समाज अस्थिर होत आहे. अशा वेळी महावीरांचे विचार मानवतेला योग्य दिशा दाखवितात.

### महावीर जयंतीचे महत्त्व आणि उत्सव

महावीर जयंती हा जैन धर्मीयांचा सर्वात महत्त्वाचा सण आहे. या दिवशी मंदिरे सजवली जातात. भगवान महावीरांच्या मूर्तींची अभिषेक, पूजा केली जाते आणि भव्य मिरवणुका काढल्या जातात. धार्मिक प्रवचने, दानधर्म आणि सेवा कार्य यांद्वारे समाजात सद्भावना वाढविली जाते. अनेक ठिकाणी गरीब व गरजू लोकांना अन्नदान, वस्त्रदान केले जाते. रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे यांचे आयोजनही केले जाते. या सणाचा मुख्य उद्देश केवळ उत्सव साजरा करणे नसून, महावीरांच्या शिकवणींचे आचरण करणे हा आहे.

### समाजासाठी महावीरांचे संदेश

महावीरांचे विचार आजच्या काळात अधिकच महत्त्वाचे ठरतात. पर्यावरणाचे रक्षण, प्राणिमात्रांबद्दल करुणा, साधेपणाने जगणे आणि नैतिक मूल्यांचे पालन करणे हे त्यांच्या संदेशाचे सार आहे. आजच्या वेगवान जीवनशैलीत माणूस मानसिक तणाव, स्पर्धा आणि असंतोष यामध्ये अडकला आहे. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला शांतता आणि समाधानाचा मार्ग दाखवते. अहिंसा आणि सहिष्णुतेच्या माध्यमातूनच समाजात खऱ्या अर्थाने एकता निर्माण होऊ शकते. महावीर जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो मानवतेचा उत्सव आहे. भगवान महावीरांनी दिलेल्या शिकवणींचा स्वीकार करून आपण अधिक सुसंस्कृत आणि शांततामय समाज निर्माण करू शकतो. या पावन दिनी आपण सर्वांनी अहिंसा, सत्य आणि संयम यांचा अवलंब करण्याचा संकल्प करावा, हीच खरी महावीरांना आदरांजली ठरेल.



# ‘या’ तारखांना जन्मलेल्या मुलींच्या आयुष्यात असते सुख-संपत्ती!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अंकशास्त्रामध्ये मूलांकाच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीचे भविष्य आणि जीवन जाणून घेतले जाते. हे अंक १ ते ९ च्या दरम्यान असतात. उदाहरणार्थ- जर एखाद्या व्यक्तीचा जन्म कोणत्याही महिन्याच्या २९ तारखेला झाला असेल, तर त्यांचा मूलांक २ (२+९ = ११, १+१ = २) असेल. अशाच प्रकारे तुम्ही तुमच्या जन्मतारखेची बेरीज करून स्वतःचा मूलांक जाणून घेऊ शकता.

आज आपण ६, १५ आणि २४ तारखेला जन्मलेल्या मुलींच्या स्वभावाबद्दल आणि जीवनाबद्दल जाणून घेणार आहोत. अंकशास्त्रानुसार त्यांचा मूलांक ६ असेल. या मुली स्वभावाने अत्यंत आनंदी असतात आणि इतरांना मदत करण्यासाठी नेहमी तयार असतात.

### मूलांक ६ च्या मुली असतात आनंदी

ज्या मुलींचा जन्म कोणत्याही महिन्याच्या ६, १५ किंवा २४ तारखेला झाला आहे त्यांचा मूलांक ६ असतो. अंकशास्त्रानुसार ६ अंकाचा स्वामी शुक्र ग्रह आहे. ज्याला सौंदर्य, सुख-सुविधा, धन-संपत्ती आणि कला यांचा कारक मानले जाते. याचा प्रभाव मूलांक ६ असलेल्या मुलींवरही दिसून येतो. या मुली स्वभावाने खूप आनंदी असतात. त्या नेहमी प्रसन्न राहतात आणि त्यांच्या चेहऱ्यावर तुम्हाला नेहमीच एक नैसर्गिक हास्य पाहायला मिळते.

### जीवनात कमावतात भरपूर संपत्ती

६, १५ आणि २४ जन्मतारीख असलेल्या मुलींचे विचार अत्यंत शुद्ध असतात. त्या कोणाबद्दलही वाईट विचार करत नाहीत. तसेच मूलांक ६ च्या मुली आपल्या आयुष्यात भरपूर पैसा कमावतात आणि करिअरमध्ये मोठे यश मिळवितात. प्रेमाच्या बाबतीतही त्या खूप खंबीर आणि विश्वासार्ह असतात. या मुलींना फॅशन डिझाइनिंग, ज्वेलरी व्यवसाय, संगीत आणि सौंदर्य क्षेत्राशी संबंधित कामांमध्ये अधिक रस असतो.

### मदतीसाठी नेहमी तत्पर

६, १५ आणि २४ तारखेला जन्मलेल्या मुली स्वभावाने अतिशय चांगल्या असतात. त्या नेहमी इतरांना मदत करण्यास तयार असतात. जर कोणी त्यांच्याकडे कसल्याही प्रकारची मदत मागितली, तर त्या सहसा ‘नाही’ म्हणू शकत नाहीत. याच स्वभावामुळे लोक त्यांच्याकडे लवकर आकर्षित होतात. त्यांचा आवाजही अत्यंत गोड आणि मोहक असतो. तसेच, शुक्राचा अंक असल्याने या मुली दिसायलाही खूप सुंदर असतात.

### तणावमुक्त जीवन जगण्याला पसंती

अंकशास्त्रानुसार मूलांक ६ च्या मुली खूप शांत स्वभावाच्या असतात. त्यांना आपले जीवन मोकळेपणाने आणि कोणत्याही टेन्शनशिवाय जगायला आवडते. त्या स्वतःच्या कामात मग्न राहतात आणि त्यातच आनंद शोधतात. या मुली दयाळू मानल्या जातात आणि कोणत्याही स्वार्थाशिवाय इतरांना मदत करतात. मात्र, त्यांना शॉपिंगची खूप आवड असते, ज्यामुळे त्यांचे खर्च थोडे जास्त होऊ शकतात.

# मृत्यूवेळी ‘या’ ४ गोष्टी जवळ असल्यास मिळते स्वर्गात जागा!

## गरुड पुराणातील ‘हे’ उपाय माहीत आहेत का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जर एखाद्या व्यक्तीकडे मृत्यूच्या वेळी चार विशिष्ट गोष्टी असतील, तर यमदूत त्या व्यक्तीच्या जवळ येत नाहीत आणि आत्म्याला थेट स्वर्गात स्थान मिळते. ‘जन्म घेतलाय त्याला मृत्यू अटळ आहे’ हे सृष्टीचे शाश्वत सत्य आहे. या पृथ्वीवर असा कोणताही मानव नाही की ज्याने अमरत्व प्राप्त केले आहे. प्रत्येक व्यक्तीला हे माहीत आहे की एक दिवस आपल्यालाही हा देह सोडावा लागणार आहे. काही हिंदू धर्मग्रंथांमध्ये मृत्यूनंतरच्या आत्म्याच्या प्रवासाची सविस्तर माहिती दिली आहे. धार्मिक मान्यतेनुसार मृत्यूनंतर आत्मा ‘यमलोका’कडे प्रस्थान करतो. त्यामुळे मृत्यूनंतर नरकाची यातना सोसावी लागू नये, यासाठी प्रत्येक माणूस आयुष्यभर पुण्य कमावण्याचा प्रयत्न करतो. मात्र, केवळ उपवास आणि दानधर्म याच्या जोरावर एखादी व्यक्ती खरोखरच नरकाच्या यातनेतून मुक्त होऊ शकते का?

गरुड पुराणानुसार मृत्यूनंतर मानवाला आपल्या चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही कर्मांचे फळ भोगावेच लागते. मात्र, गरुड पुराणाच्या नवव्या अध्यायात,



भगवान विष्णूंनी गरुडाला एक विशिष्ट उपाय सांगितला आहे. असे मानले जाते, की जर एखाद्या व्यक्तीकडे मृत्यूसमयी चार विशिष्ट गोष्टी असतील, तर यमदूत त्या व्यक्तीच्या जवळ येत नाहीत आणि आत्म्याला थेट स्वर्गात स्थान मिळते.

### १) तुळशीचे रोप

सनातन धर्मात तुळशीला देवीचे रूप मानले जाते. गरुड पुराणानुसार ज्या व्यक्तीचा मृत्यू तुळशीच्या मंजिऱ्यांच्या (फुलांच्या) सान्निध्यात होतो त्या व्यक्तीला यमलोकाची यात्रा करावी लागत नाही. म्हणूनच अंतकाळ जवळ आलेल्या व्यक्तीला तुळशीच्या रोपाजवळ झोपवावे. याव्यतिरिक्त त्या व्यक्तीच्या कपाळावर तुळशीच्या मंजिरी आणि मुखामध्ये तुळशीची पाने ठेवावीत. असेही मानले जाते, की जर मृत्यू या पद्धतीने ओढवला, तर त्या व्यक्तीची यमलोकात जाण्यापासून सुटका होते.

### २) गंगाजल

मृत्यूच्या अंतिम क्षणी मृत्यूशय्येवर असलेल्या व्यक्तीच्या मुखात गंगाजल (गंगेचे पवित्र पाणी) सोडले जावे, अशी एक दृढ श्रद्धा आणि परंपरा आहे. गंगेचा उगम भगवान विष्णूंच्या चरणांतून झाला असल्याचे मानले जाते आणि तिला पापांचा नाश करणारी नदी समजले जाते. असे म्हटले जाते, की जो कोणी आपल्या अंतर्यामी गंगाजल धारण करून या जगाचा निरोप घेतो तो स्वर्गप्राप्तीस पात्र ठरतो. पुराणांमध्ये असेही म्हटले आहे, की जर एखाद्या व्यक्तीच्या अंत्यसंस्कारानंतर तिच्या अस्थींचे विसर्जन गंगा नदीत केल्यास जोपर्यंत त्या गंगेत असतात तोपर्यंत मृतात्म्याला स्वर्गात सुख मिळते.

### ३) तीळ

धार्मिक मान्यतेनुसार तीळाची उत्पत्ती भगवान विष्णूंच्या घामातून झाली असल्याचे मानले जाते. परिणामी, तीळाला अत्यंत पवित्र समजले जाते. मृत्यूसमयी व्यक्तीने आपल्या स्वतःच्या हातांनी तीळाचे दान करावे, अशी एक प्रथा आहे. तीळाचे दान केल्यामुळे असुर, दानव आणि दैत्य यांसारख्या दुष्ट शक्ती दूर राहतात, असा विश्वास आहे. शिवाय मरणासन्न असलेल्या व्यक्तीच्या उशाशी काळे तीळ ठेवण्याचा सल्ला दिला जातो. कारण असे केल्याने त्या व्यक्तीच्या आत्म्याला मुक्ती मिळण्यास मदत होते, असे मानले जाते.

### ४) कुश (पवित्र गवत)

‘कुश’ हे एका विशिष्ट प्रकारच्या पवित्र गवताचे नाव आहे. ज्याचा वापर धार्मिक विधीमध्ये केला जातो. आपल्या पवित्रतेमुळे या गवताला अत्यंत उच्च स्थान दिले जाते. परंपरेनुसार मृत्यूवेळी तुळशीच्या रोपाजवळ कुश गवताचे एक आसन तयार केले जावे आणि मृत्यूशय्येवर असलेल्या व्यक्तीला त्या आसनावर झोपवावे. या पवित्र गवताच्या स्पर्शामुळे आत्म्याला प्रवासात शांती मिळते, असे मानले जाते.

# रामदास स्वामी आणि प्रभू श्रीराम यांची जन्मतिथी एकच!

## कसे झाले संत रामसाद स्वामी ‘नारायण’?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

समर्थ रामदास स्वामी हे प्रभू श्रीरामांचे परम भक्त होते हे आपल्याला माहीत आहे. मात्र या दोघांची जन्मतिथी ही एकाच दिवशी येते हे अनेकांना माहीत नसेल. आपल्या आराध्याची आणि आपली जन्मवेळ आणि तिथी एकच असणे हे कोणत्याही भक्तासाठी सौभाग्यच म्हणावे लागेल. जाणून घेऊया कसे झाले रामदास स्वामी श्रीरामांचे दास.

समर्थ रामदास यांचा जन्म १६०८ मध्ये चैत्र शुक्ल नवमीला महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यात झाला. बालपणापासून रामदास स्वामी हे हनुमानजींसारखेच खोडकर आणि खट्याळ असल्याचे सांगितले जाते. ब्राह्मण कुटुंबात जन्मलेले रामदास यांचे नाव नारायण होते. वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी ते हनुमानजींचे भक्त बनले त्यांची पूजा व स्तोत्र पठण करू लागले. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी सलग १२ वर्षे प्रभू श्रीरामांची तपश्चर्या केली. प्रभू श्रीरामांनी त्यांना दर्शन देऊन त्यांची येथून रामदास स्वामींचा आध्यात्मिक, स्वराज्य, राष्ट्रप्रेम हा प्रवास सुरू झाला.

रामदास स्वामींनी आपले घर सोडले व ते आध्यात्मिक वाटचालीवर



निघाले. संपूर्ण देशभर त्यांनी भ्रमण केले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यांनी मठ व आखाडे बांधले. हनुमानजी व श्रीरामांच्या भक्तीत तल्लीन असताना व देशभर फिरताना रामदास स्वामींना आजूबाजूला मुघलांकडून होणाऱ्या जुलूमांविरुद्ध लढा द्यायचा असेल तर हिंदूंना एक केले पाहिजे हे ओळखले व यातून स्वराज्याची स्थापना ही संकल्पना समोर आली. त्यांनी आपल्या मठ व आखाड्यात तरुणांना व्यायाम व तंदुरुस्त राहण्यासाठी योग्य आहार निरोगी जीवनशैली शिकविली. यावेळीच छत्रपती शिवाजी महाराजांची भेट समर्थ रामदास स्वामींशी झाली आणि तेथूनच राजांनी रामदास स्वामींना आपले गुरू मानले.

अखंड स्वराज्याच्या स्थापनेसाठी मुघलांविरुद्ध लढा छत्रपती शिवरायांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील मावळ्यांकडून सुरू झाला. शिवाजी महाराजांनी त्यावेळी संत रामदास स्वामींना काही गावे भेट म्हणून दिल्याची नोंद इतिहासात आहे. रामदास स्वामींनी पैठण, सातारा, सांगली, कोल्हापूर, जालना अशा कितीतरी ठिकाणी हनुमानजींची मंदिरे उभारली. धार्मिक, भक्ती मार्गावर चालून राष्ट्रप्रेम देखील मनात ठेवून रामदास स्वामी यांनी धर्मकारण व राजकारणात आपले विचार दिले व संपूर्ण जीवन अर्पण केले.

सज्जनगडावर आयुष्यातील शेवटची काही वर्षे रामदास स्वामींनी व्यतीत केली. आपल्या आयुष्यातील शेवटचे काही क्षण देखील त्यांनी रामभक्तीत घालवले. गडावर रामदरबार स्थापन करण्यात आला होता. श्रीरामांच्या मूर्तीसमोर बसून अखंड रामनाम जप करत त्यांनी सलग पाच दिवस अन्नपाणी त्याग करून त्यांनी आपले प्राण प्रभू श्रीरामांच्या चरणी अर्पण केले. शेवटच्या श्वासात देखील त्यांच्या मुखात श्रीरामांचे नाव होते. असे रामदास स्वामी हे महान संत तर होतेच; परंतु श्रीरामभक्त समर्थ रामदास स्वामी ही त्यांची ओळख व भक्ती आजच्या युवा पिढीला निश्चितच प्रेरणा देणारी आहे.

# भक्ताच्या अंगणात साक्षात प्रकटलेला देव : ‘चेरपुल्लासेरी अय्यप्पनकावू’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केरळच्या पालक्कड जिल्ह्यातील निसर्गरम्य आणि हिरव्यागार वातावरणात वसलेले ‘चेरपुल्लासेरी अय्यप्पनकावू’ हे केवळ एक मंदिर नसून, ते लाखो भक्तांच्या श्रद्धेचे, वात्सल्याचे आणि अफाट आध्यात्मिक उर्जेचे एक जीवंत केंद्र आहे. ज्याला मलबारचे शबरीमला म्हणून अत्यंत आदराने ओळखले जाते. या पवित्र स्थानाचा इतिहास आणि पौराणिक कथा मानवी भक्तीची आणि देवत्वाच्या प्रकटीकरणाची एक अत्यंत भावस्पर्शी साक्ष देते. शेकडो वर्षांपूर्वी, आज जेथे हे भव्य ‘क्षेत्रम’ ( - मंदिर) उभे आहे तेथे ‘चेरपुल्लासेरी इल्लम’ ( - पारंपारिक केरळी ब्राह्मण घराणे) नावाचे एक सात्विक कुटुंब वास्तव्यास होते. या कुटुंबातील मुख्य व्यक्ती, ज्यांना ‘नंबुद्री’ म्हटले जायचे, ते अत्यंत धर्मपरायण होते. त्यांच्याकडे संपत्ती, प्रतिष्ठा सर्व काही होते. परंतु लग्नाला अनेक वर्षे उलटूनही त्यांच्या अंगणात पाळणा हलला नव्हता. अपत्यप्राप्तीच्या तीव्र इच्छेने आणि वंशाचा दिवा नसल्याच्या अतीव दुःखाने नंबुद्रींचे मन रात्रंदिवस रडत असे. शेवटी, सर्व मार्ग थकल्यानंतर त्यांनी पेरुवनम येथील ‘तिरुवुल्लक्कावू धर्मशास्ता’ मंदिरात जाऊन ईश्वराच्या चरणी स्वतःला वाहून घेण्याचा निर्णय घेतला.

सलग अनेक वर्षे त्यांनी तेथे अत्यंत कडक उपासमार सोसत कठोर तपश्चर्या आणि ‘भजनम’ ( - मंदिरात राहून केलेली निस्सीम भक्ती) केले. त्यांच्या भक्तीत इतकी आर्तता होती की जणू त्यांचे अश्रूच भगवंताला अभिषेक घालत होते. अनेक वर्षांच्या कठोर तपानंतरही जेव्हा कोणतीही प्रचिती आली नाही, तेव्हा आपल्या वाढदिवसाच्या आदल्या रात्री ते सर्व आशा सोडून जड अंतःकरणाने आणि रडत रडत आपल्या गावी परतले. त्या रात्री त्यांना झोप लागली नाही, मनात विचारांचे काहूर आणि डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून जेव्हा ते निराश मनाने आपल्या घराच्या ‘नडुमुट्टम’ ( - घराच्या मध्यभागी असलेले मोकळे अंगण) मध्ये आले तेव्हा तेथे जे दृश्य त्यांनी पाहिले, त्यावर त्यांचाच विश्वास बसला नाही. पहाटेच्या धुक्यात आणि मंद प्रकाशात अंगणाच्या बरोबर मध्यभागी एक अत्यंत तेजस्वी आणि दैवी खंजीर (भगवान अय्यप्पांचे आयुध) जमिनीत रोवलेला उभा होता आणि त्यातून एक अलौकिक प्रकाश बाहेर पडत होता. साक्षात ईश्वरी अस्तित्वाची ती खूण पाहून आश्चर्यचकित आणि भावविभोर झालेल्या नंबुद्रींनी थरथरणार्या हातांनी जसा त्या खंजिराला स्पर्श केला, तसा तो खंजीर एका क्षणात जमिनीत लुप्त



झाला आणि त्या जागी साक्षात भगवान शास्ता (अय्यप्पा) यांची एक अत्यंत देखणी आणि तेजस्वी ‘स्वयंभू’ मूर्ती जमिनीतून प्रकट झाली.

आपल्या भक्ताच्या अश्रूंची दखल घेऊन साक्षात भगवंत त्यांच्या अंगणात अवतरला होता. आनंदाश्रूंनी न्हाऊन निघालेल्या नंबुद्रींनी त्याच क्षणी घरात अत्यंत गडबडीत तयार केलेला ‘अडा’ ( - तांदळाचे पीठ आणि गुळाचा गोड पदार्थ) या देवाला अत्यंत प्रेमाने आणि कृतज्ञतेने अर्पण केला. भगवंताच्या प्रकटीकरणाचा तो पहिला नैवेद्य होता आणि आजही या मंदिरात भगवान अय्यप्पांना ‘अडा’ हाच सर्वात मुख्य ‘वळीपाडू’ (- नैवेद्य) म्हणून अत्यंत श्रद्धेने अर्पण केला जातो. या निस्सीम भक्तीचे फळ म्हणून नंबुद्रींना लवकरच ‘उन्नी’ नावाचा एक अत्यंत तेजस्वी पुत्र प्राप्त झाला. उन्नीदेखील आपल्या वडिलांप्रमाणेच अय्यप्पांचा परमभक्त निघाला. त्याने ऐहिक सुखांचा त्याग करून आजन्म ब्रह्मचर्य पाळून भगवंताची सेवा केली, ज्यामुळे या घराण्याचा वंश तिथेच संपला. परंतु भक्तीचा वारसा तिथेच थांबला नाही. पुढे या घराण्याचे अत्यंत एकनिष्ठ सेवक ‘उमिकुन्नू नायर’ यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचून, अहोरात्र कष्ट करून आणि भक्तांच्या लोकवर्गणीतून या एका साध्या ‘इल्लम’चे (घराचे) रूपांतर एका भव्य आणि विशाल मंदिरात केले. एका सामान्य घराचे मंदिरात होणारे हे रूपांतर आध्यात्मिक ऊर्जेच्या सर्वोच्च प्रकटीकरणाचे उदाहरण आहे. ज्या अंगणात भगवंत प्रकट झाले होते, तेच या मंदिराचे ‘शारीकोविल’ ( - मुख्य गर्भगृह) बनले आणि घराचे जुने स्वयंपाकघर ‘तिडप्पल्ली’ ( - मंदिराचा नैवेद्य बनवण्याची पवित्र जागा) बनले.

शबरीमला येथील भगवान अय्यप्पा हे ‘नैष्ठिक ब्रह्मचारी’ रूपात आहेत, तर चेरपुल्लासेरी येथील हे स्वरूप ‘गार्हस्थ्य’ ( - कौटुंबिक) आणि अत्यंत वात्सल्यपूर्ण मानले जाते. जे भक्त वय, आरोग्य किंवा इतर कारणांमुळे शबरीमलाच्या कठीण आणि खडतर यात्रेला जाऊ शकत नाहीत, ते मलबारच्या या शबरीमलात येऊन आपली नवसपूर्ती करतात आणि त्यांना शबरीमला इतकेच, किंबहुना थोडे जास्तच वात्सल्याचे पुण्य लाभते, अशी येथील दृढ श्रद्धा आहे. हे मंदिर केवळ भक्तीसाठीच नाही, तर केरळच्या पारंपारिक कला आणि संस्कृतीसाठीही जगप्रसिद्ध आहे. येथील वार्षिक ‘कलवेला’ () आणि ‘पूरम’ () उत्सवात जेव्हा सोंडेत अभिमानाने उंचावलेल्या भव्य हत्तींची मिरवणूक निघते आणि ‘थायम्बका’ ( - केरळी पारंपारिक ढोल वादन) चा गजर निनादतो, तेव्हा तेथील वातावरण एका वेगळ्याच दैवी आणि रोमांचक उंचीवर पोहोचते... इथे साधकाला एक वेगळीच शांतता आणि मूलाधार ऊर्जेची प्रचिती येते. चेरपुल्लासेरी अय्यप्पनकावू हे केवळ एक देवस्थान नसून, एका भक्ताच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी देवाने स्वतः घेतलेला तो एक अत्यंत सुंदर अवतार आहे आणि एका सामान्य घराचे एका भव्य शक्तीपीठात झालेले हे रूपांतर आजही तिथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला आपल्या कृपेच्या छायेत घेते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)